जाहिरात कात्रण आणल्यास विशेष सूट
भारतातील प्रसिद्धीप्राप्त गुप्तरोग चिकित्सक
लैगींक समस्या, गुप्तरोग
शीघ्रपतन, नपुसंकता, मुल न होणे, शुक्राणूंची कमी आणि मधुमेहाने आलेल्या कमजोरीवर कमी दिवसात खात्रीशीर इलाज केला जाईल.
(टीपः रुग्णालयात येण्याआधी फोन करुन अपॉईंटमेंट घ्यावी.)
(EMD) नकली डॉक्टर केंद्रोंसे सावधान
डॉ.मंशा डिस्पेन्सरी
प्रकाश टॉकीजमागे, बऱ्हाणपूर (म.प्र.) (कॉम्प्युटराईज्ड)
०७३२-५२५१४५९. मोबा.९८२६२७८८७१
भोंदू वैद्यांपासून सावध रहा! रुग्णालय दररोज सुरु असते. वेळ सकाळी ११ ते रात्री ९
(आपला पत्रव्यवहार किंवा उपचाराची माहिती गुप्त ठेवली जाईल.)


## थोडक्यात...

### खासदार तटकरे आज शहरात



**जळगाव ।** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे खासदार तथा प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे आज जळगाव शहरात येत आहेत. त्यांच्या सोबत रा.काँ.सेलचे अध्यक्षही उपस्थित राहणार आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रदेशाध्यक्ष यांचा हा दौरा महत्वपूर्ण मानला जात आहे.

### आषाढी एकादशीनिमित्त पिंप्राळा रथोत्सव

**जळगाव ।** श्री विठ्ठल मंदिर संस्थान, पिंप्राळे वाणी पंच मंडळ व ग्रामस्थ मंडळी यांचे सहकार्याने सालाबादाप्रमणे पिंप्राळे येथे रविवार दि. ६ जुलै रोजी आषाढी एकादशीला रथोत्सव साजरा होणार आहे. रथोत्सव कार्यक्रम सकाळी १० वाजता गांधी चौक, पिंप्राळा येथुन सुरु होईल. रथ यात्रेचा शुभारंभ जुने ग्रामपंचायत ऑफिस, पिंप्राळा येथुन सुरु होईल. श्री विठ्ठल रुखमाईच्या दर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केला आहे.

### मंगल ज्योती कलश यात्राचे जिल्ह्यात आगमन

**जळगाव ।** अखिल विश्व गायत्री परिवार शांतिकुंज, (हरिद्वार)तर्फे भारतभर सुरु असलेली मंगल ज्योती कलश यात्रेचे जिल्ह्यात आगमन झाले असून, गायत्री परिवारच्या संस्थापिका माता भगवती देवी शर्मा यांच्या जन्मशताब्दी व प पु आचार्य पंडित श्रीराम शर्मा यांनी लावलेल्या अखंड दिपचे शताब्दी वर्ष सन २०२६ मध्ये विश्वस्तरीय स्तरावर हरिद्वार येथे संपन्न होणार आहे त्याच्या प्रचार व् प्रसारासाठी संपूर्ण भारतभर मंगल ज्योती कलश यात्रा सुरु असून या यात्रेचे आगमन जळगांव जिल्ह्यात झालेले आहे. उद्या दि. ३ ते ५ जुलै दरम्यान गायत्री नगर, आदर्श नगर, महाबळ परिसर, रामानंद नगर, शिव कॉलनी, गणेश कॉलनी परिसरात फिरणार आहे. दर्शन घेउन मंगल ज्योती कलश यात्रेचे साक्षीदार व्हावे असे आवाहन गायत्री परिवार जळगांव शाखेतर्फे जिल्हासमन्वयक शिरीष नवाल यांनी केले आहे.

### राष्ट्रीय लहुजी ब्रिगेड विक्रेता आघाडी अध्यक्षपदी अनिता भोई



**जळगाव ।** राष्ट्रीय लहुजी ब्रिगेड जळगांव हॉकर्स डेली किरकोळ मच्छी विक्रेता आघाडीच्या जळगांव शहर अध्यक्षपदी अनिता राजु भोई यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय लहुजी ब्रिगेड कामगार आघाडीचे प्रदेशाध्यक्ष संजय अंभोरे, राष्ट्रीय लहुजी ब्रिगेड महिला आघाडी महानगरच्या अध्यक्षा संजना गोसावी, संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश अंभोरे तसेच भोईराज महिला मंडळाच्या पदाधिकारी सुनिता भगवान भोई, सरला गजानन भोई, सुशिलाबाई गोपाल भोई, सकुबाई रघुनाथ भोई, रेखा भरत भोई, राधा सिताराम भोई, सुनिता भोई आदिंची यावेळी उपस्थिती होती. निवडीबद्दल भोई यांचे सर्वत्र कौतुक होत असल्याचे महानगर आघाडीच्या अध्यक्षा संजना गोसावी यांनी पत्रकांन्वये कळविले आहे.

### वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरी

**जळगाव ।** शहरातील जय दुर्गा विद्यालय मेहरूण येथे स्वर्गीय वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक सागर कोल्हे यांनी वसंतरावजी नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. उपशिक्षक महेश बच्छाव यांनी वसंतरावजी नाईक यांच्या हरितक्रांती,पंचायत राज,रोजगार हमी या कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. याप्रसंगी निया राठोड, ओम चव्हाण, सोनाली राठोड, राशी कोलते या विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन स्वप्नील पाटील यांनी तर आभार पुरुषोत्तम चिमणकर यांनी मानले. याप्रसंगी उच्च माध्यमिक विद्यालयातील प्राध्यापक दीपक तळेले, प्रा.शेखर बडगुजर, प्रा. राजश्री चौधरी यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जळगाव मनपात भूसंपादनाचे रॅकेट; आ.भोळेंचा विधानसभेत आरोप



**जळगाव ।** जळगाव शहरातील चार वर्षीय बालक श्वानाच्या हल्ल्यात दगावला त्याला मदत करण्यासाठी महापालिकेकडे पैसे नाहीत अशी सबब दिली जाते. तर दुसरीकडे भूसंपादनाचे मोठे रॅकेट जळगाव महानगरपालिकेत कार्यरत असल्याचा आरोप आमदार राजूमामा भोळे यांनी विधानसभेत केला. महापालिकेकडून २०१२ मध्ये गट नं. ५१०/३, ५१०/५, ५१०/७ हे गट आरक्षित केले गेले. संबंधीत शेतकऱ्याला ३ कोटी दिले गेले असतांना, त्यांचे सर्व आकाऊंट डिटेल्स् उपलब्ध आहेत. पण तरी संबंधीत शेतकऱ्याने अधिकाऱ्यांना हाताशी धरुन जवळ-जवळ २५ कोटी रुपयांची अधिकची कोर्टाच्या माध्यमातून शासनाला मागणी केली गेली. त्यामुळे काही वकिलांना हातीशी धरुन असे रॅकेट कार्यरत असल्याचा आरोप आमदार राजूमामा भोळे यांनी केला. याप्रकरणी संबंधीत आरक्षण रद्द करण्यात येवून चौकशी करण्यात यावी व महापालिकेकडून होणारी जनतेच्या पैशांची उधळपट्टी थांबविण्यात यावी अशी मागणी करत महापालिकेच्या या गंभीर प्रकाराकडे आमदार भोळे यांनी प्रश्नोत्तराच्या तासात विधानसभेत लक्ष वेधले.

# पोलीस बंदोबस्तात रस्त्याचे काम सुरु

## आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांना केले स्थानबद्ध..!

**मुक्ताईनगर । प्रतिनिधी**

तालुक्यातून जाणाऱ्या हैदराबाद इंदोर ७५३ एल या महामार्गाच्या रस्ते बनवण्याकामी शासनातर्फे शेतकऱ्यांना कमी मोबदला मिळाला असल्याच्या कारणाने गेल्या तीन ते साडेतीन महिन्यापासून या रस्त्याचे काम शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळे बंद अवस्थेत होते परंतु आज अखेर तब्बल साडेतीन महिन्यानंतर पोलीस बंदोबस्तात सदर रस्त्याच्या कामास सुरुवात झाली.

मुक्ताईनगर तालुक्यातील बऱ्याच शेतकऱ्यांच्या शेतजमिनी हैदराबाद इंदोर ७५३ एल या महामार्गात गेलेल्या आहेत सदर शेतकऱ्यांना शासनामार्फत अत्यंत कमी मोबदला देण्यात येत असल्याचा आरोप शेतकऱ्यांतर्फे करण्यात येत आहे ही शासनातर्फे देण्यात येणारी रक्कम अतिशय कमी दराने आहे ती वाढवून देण्यात यावी या मागणी करिता मुक्ताईनगर तालुक्यातील शेतकऱ्यां तर्फे खामखेडा गावाजवळ असलेल्या पूर्णा नदीवरील पुलाचे काम तसेच नायगाव फाट्या जवळील ओव्हर ब्रिज चे काम थांबवले होते या संदर्भात शेतकऱ्यांनी तब्बल साडेतीन महिन्यांपासून आंदोलन सुरू केलेले होते या आंदोलनास मुक्ताईनगर विधानसभेचे आमदार चंद्रकांत पाटील तसेच विधान परिषदेचे आमदार एकनाथराव खडसे यांनी सुद्धा वारंवार भेटी दिलेल्या होत्या या पूर्वी सुद्धा न्हाई तर्फे शेतकऱ्यांचे आंदोलन हाणून पाडण्याचा प्रयत्न करण्यात आला होता त्यावेळेस मुक्ताईनगरच्या दोन्ही आमदारांनी या ठिकाणी भेट दिली होती त्यानंतर आज पोलीस बंदोबस्तात नायगाव फाट्या जवळील ओव्हर ब्रिजचे काम सुरू करून शेतकऱ्यांना स्थानबद्ध करीत आंदोलन हाणून पाडण्यात आले.



### सोमवारी बैठक

आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी व्यापारी संघटनेचे तालुका अध्यक्ष नितीन जैन यांनी आज मुंबई येथे ना.बावनकुळे, ना. गिरीश महाजन यांची आ. चंद्रकांत पाटील यांच्या सोबत भेट घेतली त्यानंतर आश्वासन देण्यात आले की येत्या सोमवारी संबंधित विभागाचे मंत्री तसेच आंदोलनकर्ते शेतकरी व न्हाई चे अधिकारी यांच्यामध्ये बैठक आयोजित करण्यात आली असून शेतकऱ्यांना न्याय मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# जळगाव शहरातील एकावर एमपीडीएअंतर्गत कारवाई

**जळगाव । प्रतिनिधी**

शहरातील तुकाराम वाडी परिसरात राहणारा गुन्हेगार सचिन उर्फ टिचुकल्या कैलास चौधरी (वय २६) याच्यावर जिल्हापेठ पोलीस स्टेशन येथे ९ गुन्हे दाखल आहेत.

'धोकादायक व्यक्ती' या संज्ञेत हा प्रस्ताव जिल्हापेठ पोलीस स्टेशनचे तत्कालीन निरीक्षक राकेश माणगावकर यांनी तयार करून एलसीबीला दि. १६ जून रोजी सादर केला होता. त्याचे अवलोकन केल्यावर तो जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आला होता. त्यानुसार जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी संबंधीत गुन्हेगारवर एमपीडीए कायदेअंतर्गत नागपूर कारागृहात स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार सचिन चौधरी याला नागपूर येथील मध्यवर्ती कारागृह येथे स्थानबद्ध करण्यात आले आहे.



सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पो.नि. संदीप पाटील, हे.कॉ. सुनील दामोदरे, जयंत चौधरी, रफिक शेख कालू, संदीप चव्हाण यांच्यासह जिल्हापेठचे पो.नि.प्रदीप ठाकूर, सपोनी संतोष चव्हाण, हेडकॉन्स्टेबल मिलिंद सोनवणे, विकास पोहेकर आदींनी केली आहे.

# पर्यावरण पुरक इलेक्ट्रिक स्कूटरची निर्मिती

## गोदावरी अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचा उपक्रम



**जळगाव । प्रतिनिधी**

येथील गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांनी एक कमी किमतीची, केवळ २८,००० मध्ये पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक स्कूटर यशस्वीरित्या डिझाईन व फॅब्रिकेट केली आहे.

डिझाईन ॲण्ड फॅब्रिकेशन ऑफ इलेक्ट्रिक स्कूटर या शीर्षकाखाली भाग्यश्री दिलीप विसपुते, निरज संजय हिंगणे, वैभव दिगंबर पाटील, सुमेध प्रशांत देशमुख, योगेश गणेश पाटील व भूपेश विजय पाटील या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी हा प्रकल्प तयार केला असून, विशेष म्हणजे केवळ २८,००० इतक्या कमी खर्चात ही ई-बाईक विकसित करण्यात आली आहे. ही ई-बाईक २५ किमी/तास इतकी कमाल वेगाने धावते आणि एकदा चार्ज केल्यावर ३० किमी अंतर पार करू शकते. ही गाडी प्रदूषणमुक्त व देखभाल सुलभ असून शहरी भागातील लहान अंतरासाठी उपयुक्त आहे. या प्रकल्पात सोपी व खर्चिकदृष्ट्या फायदेशीर रचना तयार केली आहे. या ई-बाईकचा डिझाईन सीएटीएआय या सॉफ्टवेअरचा वापर करून करण्यात आला असून, त्यानंतर डिझाईनचे सिम्युलेशन करून प्रत्यक्ष फॅब्रिकेशन करण्यात आले. विशेष म्हणजे, या स्कूटरसाठी लागणारी बॅटरी युनिटदेखील विद्यार्थ्यांनीच तयार केली असून, त्यात ६००० एमओएच क्षमतेच्या लिथेनियम आर्यन सेलचा समावेश आहे, आणि ही युनिट यशस्वीरित्या चाचणी घेतल्यानंतर वापरण्यात आली आहे. ३डी प्रिंटिंग तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आले आहेत. प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, प्रा. तुषार कोळी, प्रा. किशोर एम. महाजन यांचे मार्गदर्शन लाभले. यंत्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी त्यांचा प्रकल्प यशस्वी केल्याबद्दल गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील, डॉ. वर्षा पाटील (सचिव), डॉ. केतकी पाटील (सदस्य), डॉ. वैभव पाटील (डीएम कार्डिओलॉजिस्ट), डॉ. अनिकेत पाटीलयांनी कौतुक केले आहे.

# पर्यावरणाच्या संवर्धनासाठी सीडस् बॉल उपक्रम

## शिक्षक सुनिल दाभाडे यांची संकल्पना

**जळगाव । प्रतिनिधी**

शहरातील मानव सेवा प्राथमिक विद्या मंदिर, येथे इको क्लब उपक्रम अंतर्गत सीड्स बॉल (बीज गोळे) बनविण्याची कार्यशाळेत इको क्लबचे प्रमुख, सुनिल दाभाडे यांनी मार्गदर्शन करुन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सीड्स बॉल कसे बनविण्यासोबत त्याचे महत्व सांगून विद्यार्थ्यांकडून सीड्स बॉल बनवून घेतले.या उपक्रमात इ.५ वी ते ७वीच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जनजागृती व्हावी,विद्यार्थ्यांना पर्यावरणाबाबत असलेल्या जबाबदारीची जाणीव व्हावी, पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने झाड लावून आपल्या चांगल्या भविष्याची तरतूद करावी तसेच आपण लावलेल्या झाडाचे भविष्यातील फायदे असे आपल्या मार्गदर्शनात मुख्याध्यापिका माया अंबटकर यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

या उपक्रमात पर्यावरणाचे धडे देण्याबरोबरच विद्यार्थी शाळेत व परिसरात वृक्षारोपण करून संगोपन करणार आहे. मातीपासून सीड बॉल बनवून त्यात पेरु,आंबा,चिंच, निम,सिताफळ, जांभुळ अशा अनेक फळ झाडांचा बियांपासून ६००-७०० मातीचे सीड बॉल बनवून नदी किनारी, डोंगर भागात ,परिसरातील रस्ताचा किनारी टाकण्यात आले.

या कार्यक्रम प्रसंगी शाळेचा मुख्याध्यापिका माया अंबटकर,बालवाडी मुख्याध्यापिका मुक्ता पाटील, इको क्लबचे विद्यार्थी मनोजकुमार बावस्कर, योगिता घोलाणे , सर्व शिक्षक व इको क्लब चे सदस्य उपस्थित होते.

इको क्लब उपक्रम अंतर्गत सीडस बॉल कार्यशाळा घेतल्या बद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. एस.डाकलिया ,मानद सचिव विश्वनाथ जोशी व सर्व पदाधिकारी सदस्य यांनी इको क्लब टिमचे अभिनंदन केले.

# शहरात विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**जळगाव ।** शहरातील विविध शाळांमध्ये गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. स्थानिक सामाजिक संस्थांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, दप्तर, रंग आणि इतर शैक्षणिक साहित्य देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात मदतीचा हात म्हणून हा उपक्रम महत्त्वाचा ठरला आहे. अनेक स्वयंसेवकांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.






### माजी नगरसेवक बरडे यांची सामाजिक बांधिलकी

शहरातील महाबळ, समतानगर परिसरातील होतकरु विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. महागाईच्या काळात पालकांवरील भार काहीसा कमी व्हावा या उदात्य हेतूने कार्यक्रमाचे आयोजन छत्रपती संभाजी राजे नाट्यगृहात करण्यात आले. राम होंडाचे संस्थापक कै.शिवचंद्रजी जाखेटे यांच्या स्मरणार्थ संचालक प्रकाश जाखेटे, जैन उद्योग समुहाचे अध्यक्ष अशोक जैन, श्रीराम मंदिर पिंप्राळ्याचे विश्वस्थ रामेश्वर जाखेटे, उद्योजक कन्हैय्या संगताणी, संजय शहा, सुनिल झंवर, सुनिल महाजन, गोटूशेठ त्रिपाठी, डॉ.नारायण खडके, पांडुरंग खडके, ॲड. रोहन बाहेती, मनिष बाहेती, अरुण गावंडे यांच्या सहकार्य आणि नगरसेवक नितीन बरडे यांच्या सहकार्याने कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमास विधानसभेचे माजी अध्यक्ष अरुणभाई गुजराथी, पिपल्स बँकेचे भालचंद्र पाटील, कांती चौधरी, अनिल जोशी, शाम कोगटा, प्राचार्य अनिल लोहार, आप्पासाहेब कुळकर्णी आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल लोहार, सुत्रसंचालन अपुर्वा वाणी यांनी तर आभार बाहेती हायस्कुलचे मुख्याध्यापक पी.आर.जाधव यांनी मानले. कार्यक्रमास महाबळ, समतानगर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ला.ना. सार्वजनिक विद्यालय

शेठ ला.ना. सार्वजनिक विद्यालयात ॲड.अ.वा.अत्रे यांच्या जयंतीनिमित्त शाळेतील गरजू, होतकरु विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, वह्या, इयत्ता ९वी व १० च्या विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तके, वाटप करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. सुशिल अत्रे, संस्था सचिव अभिजीत देशपांडे, पारसमल कांकरिया, डॉ. अनुप दंडगव्हाळ, जयेश कुळकर्णी, मुख्याध्यापक सचिन देशपांडे, पर्यवेक्षक प्रशांत जगताप, संजय वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेचे माजी कार्याध्यक्ष अ.वा.अत्रे यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. संस्थेचे सभासद पारसमल कांकरिया यांच्या सहकार्यातून वह्या वाटप, लिपिक पराग महाशब्दे यांनी ११ हजार रुपये किंमतीची महापुरुषांच्या पुस्तकांचा संच ग्रंथालयास भेट दिला. शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका प्राजक्ता गोहील, कविता कुऱ्हाडे, सोमनाथ महाजन, हितेंद्र जोशी, योगेश सोनजे, श्रीकांत घुगे यांनी गणवेश वाटपासाठी सहकार्य केले. क्रीडा शिक्षक उल्हास ठाकरे यांच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक संच देण्यात आले. यावेळी ॲड सुशिल अत्रे यांनी विद्यार्थ्यांना मागदर्शन केले. सुत्रसंचालन स्मिता करे यांनी तर आभार पंकज महाले यांनी मानले.

# सौर कृषी पंप समस्या आता मोबाईलवरून नोंदवा

## शेतकऱ्यांनी तक्रार नोंदविल्यानंतर तीन दिवसात तक्रारीचे निवारण बंधनकारक



**जळगाव । प्रतिनिधी**

राज्यात विविध योजनांमध्ये ५ लाख ६५ हजार सौर कृषी पंप बसविण्यात आले असून सौर पंप बसविल्यानंतर त्यातील बिघाडाबाबतच्या तक्रारी मोबाईल ॲपवरूनही नोंदविण्याची सुविधा महावितरणने शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली आहे.

महावितरणने लाभार्थी शेतकऱ्यांना सौर कृषी पंप बिघडल्यास तक्रार करण्यासाठी यापूर्वी वेबसाईटवरून तक्रार करणे, संबंधित पुरवठादार कंपनीच्या वेबसाईटवर तक्रार करणे किंवा महावितरणच्या टोल फ्री क्रमांकावर फोन करून तक्रार करणे असे तीन पर्याय उपलब्ध करून दिले होते. आता मोबाईल फोनवरील महावितरणच्या ॲपद्वारे तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.



महावितरणचे मोबाईल ॲप लोकप्रिय ठरले असून वीज ग्राहक त्याचा वापर आपले वीज बिल जाणून घेणे, बिल भरणे यासह मीटर रिडिंग नोंदणी, वीज चोरी कळविणे, नादुरुस्त ट्रान्सफॉर्मरची माहिती कळविणे अशा विविध कामांसाठी करत आहेत. त्याच प्रमाणे आता शेतकऱ्यांना या मोबाईल ॲपमध्ये 'सौर पंप तक्रार' यावर क्लिक करून सौर कृषी पंपाविषयी तक्रार दाखल करता येईल. तक्रार नोंदविताना शेतकऱ्याने सौर कृषी पंपाचा लाभार्थी क्रमांक किंवा नोंदणीकृत मोबाईल क्रमांक लिहिणे गरजेचे आहे.

सौर कृषी पंप बसविल्यानंतर पंप चालत नसणे, सौर पॅनेलची नासधूस होणे, सौर ऊर्जा संच काम करत नसणे, सौर पॅनेल्सची किंवा पंपाची चोरी होणे अथवा पंपातून कमी दाबाने पाणी येणे अशा विविध तक्रारी शेतकरी करू शकतील. सौर कृषी पंप संचाचा विमा उतरविण्यात आला आहे.

शेतात सौर कृषी पंप बसविल्यानंतर पाच वर्षे त्याची देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादार कंपनीवर आहे. शेतकऱ्यांनी तक्रार नोंदविल्यानंतर तीन दिवसात तक्रारीचे निवारण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व कंत्राटदारांना त्यांनी ज्या जिल्ह्यात पंप बसविले आहेत त्या जिल्ह्याच्या ठिकाणी सेवा केंद्र उभारणे बंधनकारक करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांच्या तक्रारीचे निराकरण झाल्यावर त्यांना मोबाईलवर संदेश मिळेल. शेतकऱ्यांच्या तक्रारी व त्यांचे निराकरण याबाबत कंत्राटदार कंपन्यांच्या कामावर महावितरणच्या प्रत्येक मंडलाच्या अधीक्षक अभियंत्यांची देखरेख राहील.

# गजलनवाज भीमराव पांचाळे यांना गजल रंग पुरस्कार जाहीर

**जळगाव । प्रतिनिधी**

उत्तर महाराष्ट्रातील साहित्य क्षेत्रातील सूर्योदय सर्वसमावेशक मंडळाच्या वतीने डिसेंबर मध्ये जळगावी तिसरे अखिल भारतीय सूर्योदय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात येत असून या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने प्रथम वर्षाचा आई बिजलाई व आप्पासाहेब सुपडू पुना पगारे सूर्योदय गजल रंग पुरस्कार गजल नवाज भीमराव पांचाळे यांना मंडळाचे अध्यक्ष सतीश जैन यांनी जाहीर केला आहे.



हा विशेष पुरस्कार विचारवंत प्रा डॉ म सु पगारे यांच्या अध्यक्षतेखाली प्रदान करण्यात येणार असून रूपये एकवीस हजार , गौरवपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.बिजलाई व आप्पासाहेब डॉ म सु पगारे यांचे आई वडील आहेत.

भीमराव पांचाळे यांनी भारतासह गजल गायनाची १८ देशांमध्ये मुशाफिरी केली असून ५१ वर्षांपासून ते गज़ल गायन करीत आहे. त्यांना गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कारांसह अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे. नाशिक येथे झालेल्या दुसरे अखिल भारतीय सूर्योदय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.